# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

## कुलगुरूंना मानद कर्नल मानांकन प्रदान

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांना एन.सी.सी. व्दारा मानद कर्नल मानांकन ससन्मान प्रदान करण्यात आला. विद्यापीठ दृकश्राव्य सभागृहात संपन्न झालेल्या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांना अमरावती एन.सी.सी. ग्रुप हेडक्वार्टरचे ब्रिगेडिअर संजीव यादव यांनी प्रमाणपत्र व बॅटन देवून सन्मानीत केले. व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी उपस्थिती होती.

मानद कर्नल मानांकन स्वीकारल्यानंतर कुलगुरूंनी सर्वप्रथम भारत सरकारचे आभार मानले. पुढे म्हणाले, महाराष्ट्र एन.सी.सी. ने पंधरापेक्षा अधिक वेळा मानाचे पंतप्रधान बॅनर पटकावून विजयाची पताका सातत्याने पुढे नेली आहे. युवकांमध्ये चारित्र्य, शिस्त, नेतृत्व गुण, सामाजिक जबाबदारीचे भान विकसित करून साहस वाढविणे हा उद्देश एन.सी.सी. चा असला तरी देशाच्या सैनिकी सेवेची बीजे त्याच्या मनात रूजविण्याचे काम सातत्याने केल्या जात आहे. याशिवाय प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम, नियमितता, सहकार्याची भावना, त्याग आदी गुण त्यांच्यामध्ये रूजविल्या जातात.

उच्चशिक्षणासमोर अनेक आव्हाने आहेत, शिक्षण व संशोधनासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एन.सी.सी. व एन.एस.एस. अभ्यासेत्तर उपक्रम महत्वाचे आहेत. अभ्यासक्रमात त्याचा समावेश कसा करता होईल, याचाही विचार करण्यात येईल आणि त्यामाध्यमातून युवकांच्या सक्षणीकरणाला बळ देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे सांगून कर्नल मानांकन प्रदान झाल्यामुळे जबाबदारी अधिक वाढली असून त्या कामाला सक्षम नेतृत्व व न्याय देण्याचा प्रयत्न राहील असेही कुलगुरू म्हणाले.

ब्रिगेडीअर संजीव यादव म्हणाले, एन.सी.सी. युवकांचे फार मोठे संघटन आहे. देशासाठी सक्षम युवक घडवण्याचे कार्य एन.सी.सी. व्दारे सातत्याने होत आहे. महाराष्ट्रात सात ग्रुप असून ६२ बटालियन, २२ विद्यापीठे, ५०६ महाविद्यालये आणि ८४४ शाळांमधून विद्यार्थी घडविण्याचे कार्य विविध उपक्रमांव्दारे केल्या जाते. एक लाखापेक्षा जास्त एन.सी.सी. कॅडेट असून त्यामध्ये मुलींची संख्ये तीस टक्के आहे. एन.सी.सी. चा उपक्रम राबविण्यासाठी विद्यापीठाचे फार मोठे सहकार्य लाभत असल्याचे सांगून राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांवर त्यांनी प्रकाश टाकला.

सुरूवातीला कुलगुरूंना एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांनी मानवंदन दिली. विद्यापीठ गीताने सुरू झालेल्या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. प्रास्ताविकेतून कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी कुलगुरूंच्या सर्वांगीण कार्यावर व उपलब्धीवर प्रकाश टाकला व पुस्तके देवून अतिथींचे स्वागत केले. कर्नल व्ही. रिचर्ड यांनी संजीव यादव यांचा परिचय करून दिला. संचालन डॉ. निरज घनवटे यांनी आभार क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी मानले. कार्यक्रमाला ॲड.सौ. पदमाताई चांदेकर, व्य.प. सदस्य उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अशोक कळंबे, डॉ. डी.डब्ल्यू. निचित, अधिष्ठाता सौ. स्मिता देशमुख, डॉ. मनिषा काळे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. जे. डी. वडते, माजी प्र-कुलगुरू डॉ. जयकिरण तिडके, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, एन.सी.सी. चे कर्नल विक्रम करांडे, कर्नल व्ही. रवी राव, कॅप्टन शीला मॅथ्यूज, विद्यापीठाचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, एन.सी.सी. चे विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/०५/२०१८.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**

जनसंपर्क अधिकारी